प्रकरण सहावे :

# अनंत कदम ह्यांचे मराठी कादंबरी वाङ्‌:मयातील स्थान


| | | |
|---|---|---|
| ६.१ | प्रास्ताविक | पृ.८३ ते पृ.८४ |
| ६.२ | साठोत्तरी मराठी कादंबरी | पृ.८४ ते पृ.८६ |
| ६.३ | महानगरीय कादंबरी | पृ.८६ ते पृ.८७ |
| ६.४ | अनंत कदम ह्यांचे मराठी कादंबरीवाङ्‌:मयातील स्थान | पृ.८७ ते पृ.९४ |
| ६.५ | समारोप | पृ.९५ ते पृ.९६ |
| ६.६ | संदर्भ व टीपा | पृ.९७ |

प्रकरण सहावे :

# अनंत कदम हयांचे मराठी कादंबरीवाङ्:मयातील स्थान

## ६.१. प्रस्ताविक :

मराठी साहित्यात विविध प्रकार आहेत. कादंबरी हा त्यातीलच एक महत्त्वाचा व प्रतिष्ठाप्राप्त साहित्यप्रकार होय. त्या प्रकारामध्ये प्रामुख्याने महानगरीय कादंबरी हा उपप्रकार विपुलतेने, विविधतने व समृध्दतेने नटलेला आहे. महानगरीय जीवन हे ग्रामीण जीवनाहून खूपच वेगळ्या प्रकारचे असते. महानगरीय लोकसमूह, जात, धर्म, प्रांत, भाषा आणि समाजातील व्यक्तीचा दर्जा, व्यवसाय हयामुळे लोक एकत्र येऊन राहू लागतात. महानगरात लोसंख्येचा लोंढा प्रचंड मोठा असतो. हया प्रचंड लोकसमुहात स्वतंत्र चेहरा हरवलेल्या व्यक्तीच महानगराच्या जीवघेण्या स्पर्धेत स्वत:ला टिकवून धरण्याचा आटोकाट प्रयत्न करताना आढळतात. सामाजिक जीवनाचा अभाव आणि व्यक्तिकेंद्रिततेला येत जाणारे महत्त्व ही महानगरीय जीवनाची वैशिष्टये सांगता येतात.

कादंबरीकार हा कादंबरीच्या माध्यमातून व्यक्ती, समाजजीवन, वातावरण हयांनी तयार होणारी सुसंबध्द रचना करीत असतो. अर्थपूर्ण वाटणारा, विशेषत्वाने जाणवणारा जीवनातील एखादा भाग, एखादा अनुभव त्याला आपल्या कलाकृतीतून आविष्कृत करावयाचा असतो. त्यात त्याला अर्थपूर्ण जीवनाचे अनेक पैलू उलगडून दाखवावयाचे असतात. कादंबरीकार ज्या समाजात वावरतो, ज्या पध्दतीचे जीवन जगत असतो, त्या समाजातील प्रत्यक्ष जीवनातल्या आलेल्या अनुभवांद्वारे तो तेथील जीवनाचा पट उलगडून दाखवण्याच्या प्रयत्नात असतो. समाजात आसपास घडणाऱ्या प्रत्येक लहान मोठया घटनेचा, प्रसंगाचा अर्थ तो स्वत:च्या दृष्टीकोनातून लावू पहात असतो.

झाली. ग्रामीण समाज डोळ्यासमोर ठेवून योजना तयार केल्या जाऊ लागल्या. खेडी जागृत झाली. शहराकडे धावू लागली. पण त्यांचाही तेथे टिकाव लागेनासा झाला. योजनांचा अल्पच भाग खेडयांपर्यंत पोहोचला. भ्रष्टाचार वाढतच गेला. मध्यमवर्गीय व ग्रामीण माणूस हतबल झाला.

हया अनेकविध घटनांचे समिश्र परिणाम आणि पडसाद तत्कालीन समाजाची मानसिकता बदलण्यास कारणीभूत ठरले. जीवनमूल्ये पायदळी तुडवली जाऊ लागली. स्वातंत्र्यप्राप्तीचा आनंद मावळला. जो तो पैशाच्या मागे धावू लागला. शिक्षणाचे व्यापारीकरण झाले.

जाणिवांचा उद्रेक म्हणजेच १९६० नंतरची कादंबरी होय. हया संदर्भात गंगाधार पाटील म्हणतात, "आजच्या युगात मानवनिर्मित संस्था व्यवसायाचे विश्व इतक्या गुंतागुंतीचे व अनाकलनीय बनले आहे की, माणसाचे त्यावरील नियंत्रण सुटू लागले आहे. आजचा माणूस असहाय, दुबळा, निराधार व एकाकी बनलेला आहे. मानसिक बंडखोरी उद्‌भवते. प्रस्थापित मूल्ये, श्रध्दा व व्यवस्था नाकारल्या जातात. परात्मतेच्या या यातनामय जाणिवेहतून आधुनिक जगातील कलावंत अस्वस्थ झाले आणि त्यांनी हया जाणीवेला कलारुप दिले."[१]

सर्वदूर पसरलेल्या हया नकारात्मक भूमिकेतूनच १९६० नंतरच्या मराठी कादंबरीचा उदय झाला आहे. ही पिढी प्रस्थापित व्यवस्थेला नकार देऊ लागली, मानवी जीवनातील क्षुद्रत्व उघडयावर मांडू लागली. 'व्यक्तिवादी' वृत्ती जाऊन 'मानवतावादी' वृत्ती हया कादंबरीत अवतरु लागल्याने आत्मनिष्ठेला आणि आत्मवास्तवालाच अधिक महत्त्व आले.

१९६० नंतरच्या कादंबरीमधील अनंत कदमांचे स्थान निश्चित करण्यासाठी कादंबरीचे ढोबळमानाने काही प्रकार करणे आवश्यक आहे. हयामध्ये रंजनपर कादंबरी, विज्ञान कादंबरी, पौराणिक कादंबरी, चरित्रात्मक कादंबरी, वास्तव कादंबरी इत्यादी कादंबरीप्रकार करता येतील. वास्तव कादंबरीमध्ये ग्रामीण कादंबरी, प्रादेशिक कादंबरी, दलित कादंबरी, महानगरीय कादंबरी, अस्तित्ववादी कादंबरी, नवकादंबरी इत्यादींचा समावेश करता येईल. अनंत कदम हयांच्या बऱ्याच कादंबऱ्यांमध्ये महानगरीय परिस्थितीचे चित्रण आलेले आढळते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या महानगरीय कादंबरी हया प्रकारातील होत, हे स्पष्ट आहे.

## ६.३. महानगरीय कादंबरी :

'महानगरीय कादंबरी,' पाहाण्याअगोदर 'महानगर' हयामध्ये कोणते घटक जमेत धरुन ही वर्गवारी केली जाते, ते पाहू . भारतीय परंपरेतील मोठया वस्तीसमुहांना पूर, पूरा,नगर (संस्कृतीद्भव) व शहर (अरेबिक) ही संबोधन वापरण्यात आल्यामुळे हया वस्तींचा नागरी दर्जा कळू शकतो. भारतीय जणगणणेनुसार १८७५ पासुन १९६१ पर्यंत ज्या गावची लोकसंख्या पाच हजार किंवा त्यापेक्षा जास्त असेल, त्यांना शहर संबोधावे, असे ठरले.'[२]

इंग्रजीमध्ये 'Town' व 'City' हे शब्द काहीवेळा समानार्थी वापरले जातात, परंतु आता 'Town' हे लहान शहर व 'City' हे महानगर, विशालनगर, अतिविशाल नागरी प्रदेश असा फरक सूचित करणारे शब्द इंग्रजी भाषेत रुढ होऊ लागले आहे.

हयामध्ये लोकसंख्येवर अधिक भर दिलेला आढळतो. पण खरी नागरत्वाची संकल्पना अशी की, 'पाश्चात्य जगातील प्रबोधनामुळे आलेली वैज्ञानिक प्रगती, तंत्रज्ञान व औद्योगिक क्रांती म्हणजे महानगर होय.' तसेच पोटासाठी धावत आलेले लोकांचे लोंढे हयातूनच महानगरीय लोकसमुहाला बहुरंगी असे स्वरुप प्राप्त झाले.

महानगराच्या जडणघडणेमागील ही पार्श्वभूमी लक्षात घेऊनच आपल्याला 'महानगरीय कादंबरी' समजून घ्यावी लागते.

## ६.४. अनंत कदम हयांचे मराठी कादंबरी वाङ्:मयामधील स्थान :

भालचंद्र नेमाडे, मनोहर शहाणे हे कादंबरीकार ज्यावेळी संस्कृतीवर गांभीर्याने लेखन करीत होते त्यावेळी हिंदू संस्कृतीचा एक अपरिहार्य भाग बनलेल्या नागर जाणिवा अनंत कदम कादंबरीमधून व्यक्त करीत होते.

मूळचे पालगड जवळील खेडयातील अनंत कदम सध्या वसईमध्ये स्थायिक झाले आहेत. अनंत कदम हयांची आजवर ४१ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. त्यामध्ये १८ कादंबऱ्या, ४ काव्ये, १ नाटक, ७ इतर व इंग्रजीमधून ११ पुस्तके प्रकाशित झालेली आहेत. कादंबरीकार अनंत कदम हे वसईमध्ये राहत असल्याने त्यांच्या लेखनात महानगरीय जाणिवा मोठया प्रमाणात व्यक्त झालेल्या आहेत. त्यांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या शहरी जीवनावर व समस्यांवर आधारित आहेत. (त्यांनी १९७१ मध्ये 'किडे' ही पहिली कादंबरी लिहिली.) अनंत कदम हयांच्या कादंबऱ्या वास्तव जगाचे प्रखर चित्र रंगवतात. जातिव्यवस्थेने किडलेले, शोषण करणारे, माणुसकाहीन जग आणि त्यात जगणारे, विपरीत परिस्थितीशी टक्कर देणारे तरुण नायक असा संघर्ष कदमांच्या

कादंबऱ्यांमध्ये नाटयमय पध्दतीने रंगविलेला दिसतो. प्रचलित समाज व्यवस्थेबद्दलची चीड कदमांच्या कादंबऱ्यांमधून प्रकट होते. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या वाचकांना जवळच्या वाटतात.

अनंत कदम हयांची 'अनंत के' नावाने १९७१ मध्ये 'किडे' ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. हया कादंबरीमध्ये नोकरशाहीतील भ्रष्टाचार, चाळ संस्कृतीतील दारिद्र्य, माणुसकीचा अभाव आणि शहरातील घाईगर्दीचे जीवन हयांचे पडसाद उमटल्याने हया कादंबरीने वाचकांचे लक्ष वेधून घेतले. 'किडे' (१९७१) हया कादंबरीवर समीक्षक माधव मनोहर हयांनी दैनिक 'नवशक्ती' मधून प्रहार केला. 'नवकथेच्या पोझ ल्यालेली घाणरेडी गोष्ट,' अशा ठळक शीर्षकाखाली 'किडे' (१९७१) बद्दल नापसंती दर्शवली. पण १९७० ते १९९० हया काळाचा विचार करता महिला वाचकवर्ग मोठा होता. त्याची स्वप्ने साकार करणारी मध्यमवर्गीय मनोवृत्तीची, माफक शृंगार फुलवणारी, सांसारिक, पण 'घडीव' सुखदु:खाची रेलचेल करणारी कादंबरी हातोहात खपत होती. अशा परिस्थितीत वास्तवातील विस्तवासारखी चटका देणारी, विसंगती आणि पारंपरिक, चाकोरीची रिंगणे भेदून आशयअभिव्यक्तीची नवी क्षितिजे दर्शविण्याचे काम अनंत कदम हयांनी केले आहे.

अनंत कदम हयांच्या 'किडे' (१९७१) हया कादंबरीत 'तो' ही प्रमुख व्यक्तिरेखा आहे. 'तो' हा एक आदर्श प्रतिनिधित्व करणारा आहे. कादंबरीचा नायक तो हा अधिक प्रभावी वाटतो 'तो' त्या भोवतालच्या प्रभावी वातावरणनिर्मितीमुळे.

'किडे' (१९७१) हया कादंबरीमध्ये अनंत कदमांनी घरातील, सर्वांना नकोशा झालेल्या एका तरुण बेकाराचा एका दिवसाचा दिनक्रम तपशीलवारपणे

सांगितला आहे. कादंबरीची सुरुवातच अशी होते. 'समोरच्या मनोऱ्यातील घडयाळात सात टोले पडतात,' अशा घडयाळ्याच्या टोलानुसार कादंबरीचे अनुभवविश्व पुढे सरकण्यास महत्त्वाची भूमिका मनोऱ्यातील घडयाळ करते. हयातून त्या-त्या वेळेची वातावरणनिर्मिती वाचकांच्या मन:चक्षूसमोर येते. पहा :

'समोरच्या मनोऱ्यातील घडयाळात सात टोले पडतात..., समोरच्या मनोऱ्यातील घडयाळात आठ टोले पडतात...,(पृ.१, पृ.१९)

अनंत कदम हयांनी 'किडे' (१९७१) हया कादंबरीमध्ये उत्कृष्टपणे वातावरणनिर्मिती करुन कादंबरी यशस्वी केली आहे. कादंबरीचा नायक ज्या-ज्या परिस्थितीचे वर्णन करतो, त्या-त्या परिस्थितीची प्रचिती देणारी वातावरणनिर्मिती काही अपवाद वगळता झाली आहे.

भाषा हा कादंबरीचा एक महत्त्वाचा घटक आहे. कादंबरीकाराच्या मनातील कल्पनेच्या पातळीवर जे विशिष्ट अनुभवविश्व साकार झालेले असते, ते भाषेतून उमटते. अनुभवविश्वाला शोभेलशी, जीवनानुभव व्यक्त करण्यास पोषक ठरेल, अशीच भाषा कादंबरीकार निवडतो.

अनंत कदम हयांनी 'किडे' (१९७१) हया कादंबरीमध्ये प्रथमपुरुषी निवेदनाचा वापर केला आहे. प्रथमपुरुषी निवेदनपद्धतीमुळे लेखनात जिव्हाळा निर्माण होतो, कादंबरीतून एकसूत्रीपणा येतो. प्रथमपुरुषी निवेदनात निवेदक ही कादंबरीतील एक व्यक्तिरेखा असल्यामुळे हया कादंबरीत व्यक्त झालेले जीवन वास्तव म्हणजे एका व्यक्तिरेखेने अनुभवलेले त्याच्या दृष्टीकोनातून आंतरिक वास्तवाचे दर्शन घडविण्याची शक्यता अधिक असते. 'किडे' (१९७१) हया कादंबरीमध्ये अनंत कदमांनी छोटी-छोटी

वाक्ये वापरलेली आहेत. ‘किडे (१९७१) हया कादंबदीबद्दल भालचंद्र नेमाडे म्हणतात, “कदम हयांची शैली प्रसन्न, सुबोधतेकडे जाणारी, छोटया-छोटया बोली भाषेतल्या वाक्यातून निर्मळ आत्मनिष्ठ विश्लेषण करणारी, सूक्ष्म हळवे मनाचे पोत मांडणाऱ्या आत्मक्लेषी प्रथमपुरुषी निवेदन तंत्राची आहे. परंतु वास्तवाचे आशयद्रव्य असल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्या सामाजिकतेचा एक घटक म्हणून सामावून घेतात.”[३]

अनंत कदमांच्या ‘किडे’ (१९७१) व ‘कॅन्सर’ (१९८२) हया दोन्ही कादंबऱ्यांमध्ये स्वार्थीपणा, भ्रष्टाचार, अनैतिकता, धर्मांधता, वासनांधता हया सामाजिक प्रश्नांवर प्रसंगानुसार मुल्यात्मक विधाने आलेली असून त्यामुळे कादंबरीची उंची निश्चित वाढली आहे.

‘किडे’ (१९७१) हया कादंबरीमध्ये निराश झालेल्या तरुणाचे एका दिवासाचे चित्रण आलेले आहे. कादंबरीचा नायक ‘तो’ च्या माध्यमातून अनंत कदमांनी १९६१ मध्ये सेल्स टॅक्स व कस्टममध्ये नोकरी करताना आलेले अनुभव कमी-अधिक प्रमाणात मांडले आहेत. सकाळी उजाडल्यापासून ते दिवस मावळेपर्यंत नायकाच्या मनावरुन वाहणारे एक दिवसाचे विचार, एक दिवसाचे नायकाच्या अंत:प्रवाहाचे चित्रण आहे. जेवण, पहुडणे, खुर्चीत बसणे हया क्रियांना कादंबरीत वाव नाही. वाव आहे तो त्याच्या मनातल्या हालचालींना. मनात हे काही चालले आहे, त्यातून कादंबरीचा घाट तयार झाला आहे. नायकाचे स्वगत, स्मृतिचित्रे हयातून ही कादंबरी उलगडून जाते. वाचकाला निर्मितीप्रक्रियेच्या नानाविध शक्यता आजमावण्याचा वाव देणारी ही समर्थ कादंबरी वेधक ठरली आहे.

अनंक कदम हयांची 'स्त्रोत' (१९७७), 'पाखरु' (१९७९), 'दिवसातल्या अंधारात' (१९८०) हया कादंबऱ्यानंतरची 'कॅन्सर' (१९८२) ही चौथी कादंबरी आहे. आपल्या व्यक्तिगत आयुष्याचे थोडयाफार फरकाने चित्रण 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीत कदमांनी केले आहे. कादंबरीकार अनंत कदम हयांचा आंतरधर्मीय विवाह झालेला आहे. ते हिंदू मराठा, तर त्यांची पत्नी शेबा ही ज्यू आहे. हया मूलाधारावर 'कॅन्सर'हया कादंबरीने आकार घेतला आहे. अनंत कदम हयांच्या कादंबऱ्या आस्वादत, अवलोकन हयांच्यापेक्षा अनुभवलेपणाची जाणीव प्रकर्षाने देतात. 'किडे'(१९७१), 'पाखरु'(१९७९), 'स्त्रोत'(१९७७),'दिवसातल्या अंधारात'(१९८०),'कॅन्सर'(१९८२) इ. कादंबऱ्या वाचताना प्रेम, माणुसकी नष्ट झालेल्या समाजातील नायकाचे वेगळेपणाने वावरणे आपल्याला अस्वस्थ करते. 'कॅन्सर' कादंबरीमधील नायक हा गुलामगिरी, वशिलेबाजी हयांनी वैतागून स्वतंत्र धंदा करण्याचा विचार करतो. आर्थिक पाठबळ नसल्याने तो नोकरीच्या शोधात राहतो. प्राप्त परिस्थितीशी सामना देत असताना तो व्यवहारापेक्षा तत्त्वाला महत्त्व देतो. ध्येयवादाच्या तात्त्विक बैठकीवरुन तो साऱ्या जीवनाकडे सखोलपणे पाहातो. त्यामुळे जगण्यातील निरर्थकता त्याला बोचत राहते.

अनंत कदमांनी आपल्या बऱ्याच कादंबऱ्यांमधून स्वत: भोगलेले आयुष्य आणि भावलेले आयुष्य यातून कादंबरीविश्व निर्माण केले आहे. 'आयुष्य'म्हणजे एक दुख:भोग, हे कदमांच्या लेखनाचे प्रमुख सूत्र राहिले आहे, असे वाटते.

'कॅन्सर'(१९८२) हया कादंबरीमध्ये 'ह्रदयनाथ' हा नायक आहे, तर 'शबाना' ही नायिका आहे. हया दोघांच्या आंतरधर्मीय विवाहामुळे निर्माण होणारे पेचप्रसंग व त्यातून सुटण्यासाठी नायकाने केलेले जिवाचे रान हयाचे चित्र परिणामकारक

व सत्य परिस्थितीचे भान राखून आलेले आहे . हृदयनाथ प्राप्त परिस्थितीतीमुळे हैराण झाला आहे, निराश झाला आहे. पण हतबल झालेला नाही.

'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधील चित्रण हे वास्तव वाटते. 'कॅन्सर' मधून समाजमनाला लागलेल्या विविधस्तरीय कॅन्सरची (रोगाची) बहुविध रुपे वाचकासमोर ठेवण्यात कादंबरीकार अनंत कदम यशस्वी झाले आहेत. योग्य वातावरणनिर्मिती, योग्य भाषाशैली व आवश्यक व्यक्तिरेखा हयांच्यातून 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीतील अनुभवविश्व साकारत जाते. अनंत कदम हयांच्या बहुतेक सर्व कादंबऱ्या हया महानगरीय वातावरणातील आहेत. त्यामधील 'किडे'(१९७१) व 'कॅन्सर'(१९८२) हया दोन्ही कादंबऱ्यामधून महानगरीय समस्यांचे, तेथील वातावरणाचे, परिस्थितीचे यथार्थ चित्रण आलेले आहे.

मुळचे कोकणातील पालघड जवळील एका खेडयातील अनंत कदम हयांचे कुटुंब वडिलांच्या नोकरीमुळे मुंबईमध्ये आले. त्यांनी मुंबईतील जी.टी. हॉस्पीटल कंपाऊंडमधील एका चाळीत जवळ-जवळ तीस वर्षे जीवन व्यतीत केले. हया चाळीबद्दल अनंत कदम म्हणतात, "ज्या चाळीत मी वयाची तिशीपर्यंत माझं जीवन व्यतीत केलं, त्या चाळीत मी राहिलो नसतो, ती चाळ माझ्या जीवनात आली नसती, तर 'किडे' हया कादंबरीने केव्हाच जन्म घेतला नसता."[५] हयावरुन अनंत कदमांचे कादंबरीलखेन हे अनुभवलेपणाची जाणीव प्रकर्षाने करुन देणारे आहे हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे 'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधील बराचसा भाग अनंत कदमांच्या त्रांगडे (२००६) हया आत्मकथनामध्ये झालेला आहे.

'कॅन्सर' (१९८२) हया कादंबरीमधून आंतरधर्मीय विवाहाबरोबर सरकारी कामामधील भ्रष्टाचार, वशिलेबाजी, धर्मांधता, लाचारी इ. सामाजिक समस्यांचे बहुविध दर्शन कादंबरीकाराने घडविलेले आहे. हा सर्व संघर्ष व माणसाची विकृत मनोवस्था पाहिल्यावर कादंबरीकार अनंत कदमांच्या समृध्दतेची व बुध्दिवादी विचारसरणीची ओळख पटते. 'कॅन्सर'(१९८२) हया कादंबरीमधून सामाजिक प्रश्नांचे निदान सुचविले आहे. परंतु हयावरची ठोस अशी उपाययोज़ना निश्चित केलेली नाही. एकूणच, नायकाच्या मनामध्ये स्वत:च्या अस्तित्वाबद्दल प्रेम असले, तरी एखादया संघटनेच्या माध्यमातून किंवा स्वत: क्रियाशील होऊन समस्यांवर उपाय सुचविण्याचे धाडस नायकाच्या अंगी नाही. कादंबरीच्या नायकाने केलेले प्रयत्न, त्याने दाखविलेली बंडखोरी ही निकामी वाटते, त्या-त्या क्षेत्रापुरती मर्यादित वाटते.

'कॅन्सर'मधील हृदयनाथाचे कुटुंब कोकणातील आहे. नोकरीनिमित्त ते शहरामध्ये आले आहे. हृदयनाथ कुटुंबासहित चाळीमध्ये राहत असून घरातील मोठा मुलगा हया नात्याने बरीचशी जबाबदारी त्याने उचलली आहे. हृदयनाथाची आई ही कोकणीच भाषा बोलते व कोकणामध्ये राहिल्याने ती सनातनीवृत्तीची आहे. धर्म, जात, रुढी, परंपरा इ. नुसार ती वागणारी आहे. त्यामुळे आईचा हृदयनाथाच्या आंतरधर्मीय विवाहाला विरोध होतो. समाजाला घाबरुन सनातनी विचारातून ती हृदयनाथाला घराबाहेर काढते. पहा :

'आईची आदळ आपट सुरु झाली. त्या दिवशी तिनं घर डोक्यावर घेतलं. "रांड, घरात शिरली आणि माझं घर बुडवलं. घराची राखरांगोळी केली. माझ्या पोरीचं

वाटोळ केलं." आक्रोश करुन रडू लागली. डोकं आपटून घेतले. आरडाओरडा केला. शबानावर धावत गेली. तिचे तिनं केस धरले.

"रांडेला बाहेर काढा. रांड, घरबसवी !" (पृ.७६,७८).

अशा भाषाशैलीचा वापर करुन कादंबरीकार अनंत कदम आंतरधर्मीय विवाहास होणारा विरोध, असणारा दृष्टिकोन स्पष्ट करुन सांगितला. योग्य भाषाशैलीमुळे कादंबरीतील वातावरणनिर्मिती चांगली झाली आहे. 'कॅन्सर' (१९८२) मधील व्यक्तिरेखा हया त्या-त्या विचारांचे, वृत्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आहेत. काही व्यक्तिरेखा प्रामणिकपणे मदत करणाऱ्या आहेत. तर काही व्यक्तिरेखा हया कारण नसताना मानसिक त्रास देणाऱ्या आहेत. समाजामधील ही वस्तुस्थिती प्रभावीपणे कादंबरीकाराने मांडली आहे. त्याचबरोबर सर्व समाजाचा विरोध आणि कमालीची ओढग्रस्तता असतानाही कादंबरीची नायिका पतीच्या सहवासात कमालीची तृप्त आहे, वेळप्रसंगी ती नवऱ्यालाच धीर देते.

एकूणच, कादंबरीमधील व्यक्तिरेखा, वातावरणनिर्मिती, भाषाशैली इत्यादी घटक प्रभावीपणे मांडण्यात आलेली आहेत. 'कॅन्सर'(१९८२) हया कादंबरीचा नायक हृदयनाथ हयाला कॅन्सर नसल्याचे डॉक्टरांनी सांगणे व त्याच वेळेस पति ऐवजी 'मलाच मरण दे,' असे म्हणणे व नेमक्या सर्व गोष्टी जुळून येणे, हे न पटण्यासारखे आहे. हयामधील बुध्दिवाद कमी होऊन भावनिकता व अंधश्रध्दा हयांच्यात अडकुन कादंबरीच्या अनुभवविश्वाची सलगता, उत्कटता कमी झाली आहे, असे वाटते.

## ६.५. समारोप :

कादंबरीकार अनंत कदमांची आजपर्यंत ४१ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यामध्ये १८ कादंबऱ्या आहेत. त्यांच्या १९७१ पासूनच्या कादंबरीलेखनामध्ये प्रामुख्याने महानगरीय वातावरणाचा समावेश आहे. कादंबरीकाराने भोगलेले आणि भावलेले आयुष्य हयातुन कादंबरीविश्व व अनुभवविश्व निर्माण झाले आहे, हे त्यांच्या प्रत्येक लेखनामधून जाणवते.

'किडे'(१९७१) ही कदमांची पहिली प्रकाशित कादंबरी आहे. शहरातील, चाळातील जीवनाचे चित्रण हा त्या कादंबरीचा केंद्रबिंदू आहे. माणसाचा विचार-विकारांचे विदारक चित्रण 'किडे' (१९७१) मधून पहावयास मिळते. पैशाला असणारे महत्त्व आणि हयावरुनच ठरणारी माणसांची किंमत हयाबद्दल कादंबरीकाराने तीव्र नाराजी व्यक्त केलेली आहे. 'किडे'(१९७१) प्रकाशित झाल्यानंतर समीक्षक माधव मनोहर हयांनी 'नवशक्ती' मधून आक्षेप घेतला. 'नवकथेची पोझ ल्यालेली घाणरेडी कथा,' अशा ठळक शीर्षकाखाली 'किडे' (१९७१) हया कादंबरीबद्दल त्यांनी नापसंती दर्शविली. ते पुढे म्हणतात, "कोठचा तरी एक फालतू नायक उठतो आणि साऱ्या मानवांना 'किडे' ठरवतो, याचा अर्थ काय?" हया आक्षेपाने कादंबरीवर चर्चा झाली. त्यांच्या सर्व लेखनाचे प्रमुख सूत्र 'आयुष्य म्हणजे एक दुखःभोग' हेच आहे. अनंत कदम अस्तित्वावादी लेखन करणारे जरी असले, तरी त्यांचे बरेचसे लेखन हे निराशावादी आहे. शिवाय ते अस्वस्थ करणारे आहे. कादंबरीच्या नायकाच्या ठिकाणी मात्र हया समस्या सोडविण्याचे उपाय नाहीत किंवा प्राप्त परिस्थितीशी बंडखोरी करणारे सामर्थ्यही नाही. हयाला कारणीभूत कादंबरीकार अनंत कदम हयांचा स्वभाव गुणच असावा, असे वाटते. कदमांनी आपल्या

आयुष्यात अनेक संकटामधून, समस्यांमधून मार्ग काढले. विशेष म्हणजे जीवनातील कटू अनुभवांमुळे त्यांची जीवनदृष्टी डागाळलेली नाही. सर्व अनुभवांमधून तावूनसुलाखून निघाल्यामुळे त्यांची दृष्टी आता अधिक व्यापक, सतेज झाली आहे. त्यांचा नायकही ध्येयवादी आहे. निराशेमुळे तो हतबल झालेला नाही.

गेली चाळीस वर्षे मराठी साहित्यामध्ये मोलाची भर घालणाऱ्या अनंत कदमांची फारशी दखल घेतली गेलेली नाही. परंतु त्यांची काही पुस्तके ओरिसा, मद्रास, बंगाल येथून प्रकाशित झाली आहेत. 'डेथ ऑफ गॉड'(२००१)'पेन्स अँड पॅगस्'(१९९९), 'माय इंडिया अ शेम इन फ्रि डम(२००१)'असे त्यांचे अनेक इंग्रजी कवितासंग्रह घसरलेली सामाजिक मूल्ये, भ्रष्टाचाराला मिळालेली राजमान्यता हया दुखद जाणिवा व्यक्त करतात. त्यांच्या इंग्रजी कविता 'अनंत के.' हया नावाने आसाम, ओरिसा, हैदराबाद, कलकत्ता, बंगलोर, बिहार येथील नियतकालिकांमधून प्रसिध्द झालेल्या आहेत. कलकत्ता येथून आंतरराष्ट्रीय कवींचा प्रतिनिधित्व (डेस्प्रींग) कवितासंग्रह १९९९ मध्ये प्रसिध्द झाला. त्यात 'अनंत के' च्या दोन कवितांचा अंतर्भात आहे. अनंत कदमांची इंग्रजीतून नऊ पुस्तके आहेत. 'Beyond Barriers' ही त्यांची कादंबरी लंडनमधून प्रकाशित झाली आहे. त्याचप्रमाणे 'The Buddha for all' हे इंग्रजीतील पुस्तक ओरिसातून प्रकाशित झाले.

'इंग्रजी' व 'पाली' भाषेतून एम्.ए. झालेल्या अनंत कदमांची महानगरीय कादंबरीलेखनाबरोबर इतर लेखनामधील ही मुशाफिरी वाखाणण्याजोगी आहे.

## ६.६. संदर्भ व टीपा :


१. पाटील गंगाधर, 'समीक्षेची नवी रुपे,' मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्तीः इ.स. १९८१, पृ.९८

२. पहा : देशपांडे चं.धु., 'शहरे,' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्तीः इ.स. १९८०, पृ.११

३. पहा : नेमाडे भालचंद्र अंतर्भूत : 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरुप' (१९६० ते १९७५), पवार गो.मा. व हातकणंगलेकर म.द. (संपा)., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्तीः १९८६, पृ.५०

४. पहा : गिरप वसुंधरा, समीक्षण, 'मुंबई रविवार सकाळ,' मुंबई, ६ फेब्रुवारी १९८३, पृ.४

५. कदम अनंत, 'त्रांगडे,' अनघा प्रकाशन, ठाणे, प्रथमावृत्तीः मार्च २००६, पृ.७१